**<u>नि.क्र.१२३ वरील आदेशाप्रमाणे साक्षीदाराचा जबाब</u>**

**माझे नांव:-अंतेश्वर राजेश्वर राचमाले, वय:- ४९** वर्षे,

**व्यवसाय:-** नौकरी, **रा.** अहमदपूर.

**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.व्ही. देशमुख यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०१.** मी छाननी लिपीक म्हणून अहमदपूर भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत आहे. मला न्यायालयीन समन्स आलेले आहे. कोर्ट कमीशनर म्हणून उपअधिक्षीक, भूमी अभिलेख यांची नेमणूक या प्रकरणी झाली होती. त्यांनी मला आदेशीत करून या प्रकरणी मोजणी करण्याविषयी सांगितले. अहमदपूर येथील स.क्र.१/२ याची मोजणी करायची होती. सदर स.क्रमांकाची हद्द निश्चिचीतीची ती मोजणी होती. तसेच, त्यात अतिक्रमण असल्यास ते दाखवायचे होते.

**०२.** मोजणीची तारीख निश्चित करुन तशा नोटीसा वादी, प्रतिवादी आणि लगत हिस्सेदार यांना पाठविल्या. दि.२७/१२/२०२४ रोजी मोजणी करायची होती. मोजणी अर्ज, न्यायालयाचा आदेश, गाव नकाशा असे तीन कागद घेवून मी त्या ठिकाणी गेलो. वादी, प्रतिवादी व पंच तेथे हजर होते. मी मोजणी केली. त्यानूसार नकाशा तयार केला. आमच्या कचेरीत येवून मुळ अभिलेखावरुन तो इम्पोज करुन घेतला आणि त्यानूसार अंतीम नकाशा तयार केला. २/५ स.क्रमांकातून १/२ स.क्रमांकात १ आर क्षेत्राचे अतिक्रमण त्यात दिसून येते. ते लाल रंगाने मी दाखवले आहे. त्यातील सूची आणि त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी, मन्मथ तेजबंद आणि राजेश कोरडे यांच्या सहया आहेत. त्यास **<u>नि.क्र.१२५</u>** देण्यात येते.

**०३.** स.क्र.१ ची यापुर्वी काही मोजणी झाली होती का याची चौकशी मी केलेली नाही. नि.क्र.७४ हा दि.१७/०५/२००६ रोजीचा नकाशा आता मला दाखवला. नि.क्र.७४ मधील वहिवाटीच्या खुणा आणि मी तयार केलेल्या नकाशातील खुणा यांच्यात फरक आहे. एखाद्या स.क्रमांकाची कितीही वेळा

मोजणी केली तरी त्याच्या अभिलेखातील नोंदीमध्ये फरक होत नाही, मात्र वहिवाटीत फरक होवू शकतो. छाननी लिपीकाचे काम अहवालांची छाननी करून वरिष्ठांकडे देणे असे आहे. मोजणी करायचा मला अधिकार नाही, असे खरे नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.व्ही.जी.कोरे वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**०४.** मोजणी आदेशात काय मजकूर आहे हे मला सांगता येईल. अतिक्रमणाबाबत त्यामध्ये विचारणा करण्यात आलेली आहे. प्रकरण न बघता या प्रकरणी किती वादी, प्रतिवादी आहेत हे मला सांगता येणार नाही. स.क्र.२/५ जमिनीतून स.क्र.१/२ मध्ये १ आर अतिक्रमण झालेले आहे. स.क्र.१/२ चे स.क्र.२/५ मध्ये अतिक्रमण नाही. स.क्र.१/२ मध्ये वहिवाटीप्रमाणे मोजणी करतेवेळी २८ आर क्षेत्र दिसले. ७/१२ उतारा स.क्र.१/२ चा १८ आर क्षेत्राचा आहे. ७/१२ पेक्षा अतिरीक्त १० आर क्षेत्र कोणाचे आहे हे मला सांगता येणार नाही. अतिरीक्त क्षेत्र जे अतिक्रमीत आहे, ते स.क्र.२/५ चेच आहे, परंतु ते प्रतिवादींचेच आहे असे मला सांगता येत नाही. अतिरीक्त १० आर क्षेत्र प्रतिवादींचे आहे, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन अहवालात मी तसा उल्लेख केला नाही. हे खरे नाही की, अहवाल चुकीचा आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

**दिनांक ०६/१०/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**